## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# संकलित मूल्यमापन २ : २०२३-२४ : सराव प्रश्नपत्रिका

## इयत्ता - पाचवी : विषय - मराठी (प्रथम भाषा)

## शिक्षकांसाठी सूचना आणि उत्तरसूची

'STARS' प्रकल्पांतर्गत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात राज्यस्तरावरून विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी - १ व संकलित मूल्यमापन चाचणी - २ अशा तीन शैक्षणिक प्रगती चाचण्या घेण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने संबंधित इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही याची पडताळणी या चाचण्यांद्वारे करण्यात येईल. राज्यस्तरावरून २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात प्रथम सत्राअखेर इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्तींवर आधारित इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची संकलित मूल्यमापन १ घेण्यात येत आहे. सदर चाचणीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांनी संबंधित इयत्तेमधील अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केल्या आहेत हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे.

**चाचणीचे स्वरूप :** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इयत्तानिहाय व विषयनिहाय अध्ययन निष्पत्तींचे विकसन करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक ही अध्ययन निष्पत्तींच्या आधारे तपासली जाणार आहे. या पुढील काळात होणारी सर्व राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणे व राज्य अध्ययन संपादणूक सर्वेक्षणे ही अध्ययन निष्पत्तींवर आधारित असणार आहेत, त्यामुळे संकलित मूल्यमापन-२ साठी प्रश्नपत्रिका विकसित करताना संबंधित इयत्तांच्या मराठी विषयाच्या अध्ययन निष्पत्ती विचारात घेतल्या आहेत.

**तोंडी चाचणी घेण्यासाठी सूचना :**

१) तोंडी चाचणीसाठी काही पूरक साहित्य आवश्यकता असल्यास (उदा., वाचन उतारे, शब्दकार्डे, वाक्यकार्डे, चित्रे इ.) असे साहित्य पुरेशा संख्येने चाचणी सुरू करण्यापूर्वी तयार करून ठेवावे.
२) तोंडी चाचणी घेत असताना चित्र निरीक्षण, श्रवण, वाचन इ. कृतींसाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ द्यावा.
३) विद्यार्थ्यांची नेमकी संपादणूक लक्षात येण्यासाठी पारदर्शी व तणावमुक्त वातावरणात चाचणी घेण्यात यावी.
४) वयोगटानुसार विद्यार्थ्यांच्या घरच्या/परिसर भाषेचा स्वीकार करावा.
५) तोंडी प्रश्नांचा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वैयक्तिक स्वरूपात घ्यावा व प्रतिसादानुसार लगेचच प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्राप्त गुणांची नोंद दिलेल्या गुणनोंद तक्त्यात करावी, अर्धा गुण देऊ नये.
६) तोंडी चाचणी ही लेखी चाचणीच्या दिवशीच पूर्ण होईल असे नियोजन करावे.

**लेखी चाचणी घेण्यासाठी सूचना :**

१) इयत्ता तिसरी व चौथीच्या मुलांसाठी एक एक प्रश्न वाचून दाखवावा, काय करावयाचे आहे, हे समजावून सांगावे व तो प्रश्न सोडवायला सांगावा. याप्रमाणे एक एक प्रश्न पूर्ण करत चाचणी सोडवून घ्यावी.
२) इ. पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना आवश्यकता आहे, त्यांना प्रश्न समजावून सांगावा. मात्र उत्तराचा संकेत देऊ नये.
३) विद्यार्थ्यांची नेमकी संपादणूक लक्षात येण्यासाठी पारदर्शी व तणावमुक्त वातावरणात चाचणी घेण्यात यावी. शाळेच्या मधल्या सुट्टीची वेळ झाल्यास अथवा मुले कंटाळली आहेत असे वाटल्यास थोडा वेळ थांबून नंतर उरलेली चाचणी घेण्यास हरकत नाही.
४) लेखी चाचणीमध्ये उत्तरे लेखनासाठी आवश्यक जागा देण्यात आलेली आहे.
५) संबंधित विषय शिकवणाऱ्या शिक्षकांनी आपल्या वर्गात ही चाचणी घ्यावयाची आहे व ती तपासावयाची आहे.
६) प्रत्येक विद्यार्थ्याची सद्य:स्थितीमध्ये नेमकी संपादणूक कशी आहे, हे पाहणे हा मुख्य उद्देश चाचणी घेण्यामागे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत सदर चाचणी घेण्याबाबतचा निर्णय संबंधित विद्यार्थ्यांचा दिव्यांग प्रकार लक्षात घेऊन शाळा मुख्याध्यापक, शिक्षक यांनी घ्यावा. आवश्यकतेनुसार विशेष तज्ज्ञ किंवा विशेष शिक्षक यांची मदत घ्यावी.
७) प्रात्यक्षिक/तोंडी आणि लेखी चाचणीचा गुणनोंदणी तक्ता चाचणीच्या सुरुवातीला देण्यात आलेला आहे. प्रश्ननिहाय गुणांची नोंद सदर तक्त्यात शिक्षकांनी करावयाची आहे. अर्धा गुण देऊ नये.
८) शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणांचे विश्लेषण करून वर्गस्तरावर गरजेनुरूप कृती-कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करावी.

## उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना
## इयत्ता : पाचवी – विषय : मराठी (प्रथम भाषा)

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| १० | ४० | ५० |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| | **तोंडी चाचणी** | | |
| प्र. १) | **खाली दिलेला उतारा वाच. त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 05.01.02 | ५ |
| | अ) आभाळाकडं! आकाशाकडं | | १ |
| | आ) दुष्काळानं | | १ |
| | इ) दुष्काळ पडल्यानं लोकं गाव सोडून दूर चालली, गावपांढरी सोडून माणसं जगायला दूर चालली म्हणून गावे ओस पडू लागली. | | १ |
| | ई) दुष्काळामुळं प्रजा इतकी हैराण झाली, त्रासली की अति दु:खाने, अति रडल्यामुळे डोळ्यांतले पाणी आटून गेले, अशा आशयाचे समर्पक उत्तर असल्यास स्वीकारावे. (बोलीभाषेतील उत्तराचा स्वीकार करावा.) | | २ |
| प्र. २) | **खाली दिलेल्या चित्राचे निरीक्षण कर व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 05.01.04 | ५ |
| | अ) खेड्यातील/ग्रामीण भागातील/गावाकडचे अशा इतरही समर्पक उत्तराचा स्वीकार करावा. | | १ |
| | आ) शाळेत/भाजी आणायला/सामान आणायला अशा सारखे इतरही इत्यादी समर्पक उत्तर असल्यास. | | १ |
| | इ) घरे, पाण्याचा रांजण, गाडीचे चाक, अशा आशयाचे समर्पक उत्तर स्वीकारावे. | | १ |
| | ई) चित्राच्या आशयानुरूप विद्यार्थ्याची समज, आकलन पातळी, भावविश्व यांचा विचार करून उत्तराचा स्वीकार करावा.<br>उदा. चित्रातील दृश्य सुंदर आहे. मलाही अशा ठिकाणी राहायला आवडेल इत्यादी. | | २ |
| | **लेखी चाचणी** | | |
| प्र. ३) | **खाली दिलेला संवाद वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 05.01.01 | ५ |
| | अ) राज्यात सगळ्यांनी गाण्यात बोलायचं, कोणीही साधं बोलायचं नाही सगळं गातगातच बोललं पाहिजे. | | १ |
| | आ) आधी सुळावर चढवणार; मग हत्तीच्या पायी देऊन कडेलोट करणार आणि पुन्हा असं करणार नाही हे त्या व्यक्तीकडून लिहून घेणार. | | १ |
| | इ) दवंडी – डांगोरा, बातमी मोठ्याने ओरडून जाहीर करणे, घोषणा करणे अशा उत्तरांचा स्वीकार करावा. | | १ |
| | ई) • विद्यार्थ्यांच्या भावविश्वाचा विचार करून विद्यार्थ्यांचे अनुभव, समज, आकलन पातळी यांच्या पातळीवरून सांगितलेले मत मांडल्यास व समर्थन केल्यास. | | २ |
| | • विद्यार्थ्याने मत मांडल्यास | | १ |
| | • विद्यार्थ्याने मांडलेल्या मताचे समर्थन केल्यास | | १ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. ४) | **खालील सूचना फलक वाच व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही.** | 05.01.05 | ४ |
| | अ) जलपुरवठा विभाग/जलपुरवठा विभाग, कात्रज, पुणे.<br>आ) २५ फेब्रुवारी, २०२४<br>इ) पाण्याचा काटकसरीने वापर करेन, पाणी वाया जाऊ देणार नाही.<br>यांसारखे प्रश्नाला अनुसरून कोणतेही दोन उपाय सुचविल्यास | | १<br>१<br>२ |
| प्र. ५) | **तुझ्या शाळेत क्रीडा महोत्सव संपन्न होणार आहे. त्याकरिता शाळेच्या भित्तिपत्रकावर दिलेल्या मुद्द्यांचा विचार करून माहिती लिही.** | 05.01.08 | ३ |
| | विद्यार्थ्यांनी अनुभव, समज, आकलनपातळीवर लिहिलेली वाक्ये स्वीकारावीत.<br>• मुद्दानिहाय मुद्द्यांचा समावेश करून समर्पक वाक्य लिहिल्यास प्रत्येकी १ गुण द्यावा. | | |
| प्र. ६) | **दिलेल्या सूचनेप्रमाणे उत्तरे लिही.** | 05.01.09 | ४ |
| | अ) अंबर - आकाश, गगन, नभ, व्योम आणि वस्त्र, कापड अशा योग्य शब्दास-<br>आ) सुंदर × कुरूप<br>वाक्य - आशयानुरूप अर्थपूर्ण समर्पक वाक्याचा स्वीकार करावा. | | २<br>१<br>१ |
| प्र. ७) | **दिलेल्या सूचनेप्रमाणे उत्तरे लिही.** | 05.01.10 | ७ |
| | अ) १) समीक्षाने सारिकाला हाका मारल्या.<br>२) माझ्या मैत्रिणीला लाल रंगाची पिशवी खूप आवडली.<br>आ) १) समीरचा जीव वरखाली झाला.<br>२) मोर दिसताच राघव टाळ्या पिटू लागला.<br>इ) १) गटात न बसणारा शब्द - फूल.<br>कारण - फूल नाम/विशेष्य आहे, तर इतर शब्द विशेषणे आहेत.<br>ई) माणसाचं मन जसजसं मोठं होतं तस तसं 'माझी' ही कल्पनाही विस्तारत जाते.<br>'हे विश्वचि माझे घर' असं म्हणण्याइतकं संतांचं मन मोठं होतं. | | १<br>१<br>१<br>१<br>१<br>१<br>१ |
| प्र. ८) | **पुढील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिही व तसेच ते विरामचिन्ह वापरून एक वाक्य लिही.** | 05.01.11 | २ |
| | अ) १) ! उद्गारचिन्ह : वाक्य - चिन्हाचा वापर करून तयार केलेल्या वाक्यास.<br>उदा. अबब! केवढी उंच ही इमारत!<br>२) - संयोगचिन्ह : वाक्य - चिन्हाचा वापर करून तयार केलेल्या वाक्यास.<br>उदा. मांजराचं पिल्लू माझ्या मागं-पुढं करत होतं. | | १<br>१ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. ९) | **दिलेल्या सूचनेप्रमाणे उत्तरे लिही.** | 05.01.13 | ५ |
| | अ) १) लग्नसमारंभ : लग्नसमारंभात प्रत्येकाने स्वत:ला जेवढी भूक असेल, तेवढेच वाढून घ्यावे. | | १ |
| | २) सहल : सहलीला निघताना किंवा सहलीच्या ठिकाणी मोजकेच अन्नपदार्थ बरोबर बाळगावेत. यासारखी समर्पक उत्तरे स्वीकारावीत. | | १ |
| | आ) वसंतऋतूतील बदल : | | |
| | • किमान चार ते पाच समर्पक वाक्ये लिहिल्यास. | | ३ |
| | • किमान तीन समर्पक वाक्ये लिहिल्यास. | | २ |
| | • किमान एक किंवा दोन समर्पक वाक्ये लिहिल्यास. | | १ |
| प्र.१०) | **शालेय परिसराची स्वच्छता याबाबत तुला काय वाटते? ते लिही.** | 05.01.14 | ५ |
| | • नऊ ते दहा वाक्ये लिहिल्यास. | | ५ |
| | • सात ते आठ वाक्ये लिहिल्यास. | | ४ |
| | • पाच ते सहा वाक्ये लिहिल्यास. | | ३ |
| | • तीन ते चार वाक्ये लिहिल्यास. | | २ |
| | • एक ते दोन वाक्ये लिहिल्यास. | | १ |
| प्र.११) | **खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही व गोष्टीला योग्य शीर्षक दे.** | 05.01.15 | ५ |
| | • विद्यार्थ्यांची समज व भावविश्व यांचा विचार करावा.<br>• गोष्टीतील आशयाचा विचार करावा.<br>• बोलीभाषेतील शब्दांचा उपयोग केल्यास ते स्वीकारावेत. | | |

| अ. क्र. | विषय | गुणदान |
|---|---|---|
| १. | समर्पक शीर्षक | १ गुण |
| २. | किमान पाच ते सहा वाक्ये | ४ गुण |
| ३. | किमान चार वाक्ये | ३ गुण |
| ४. | किमान तीन वाक्ये | २ गुण |
| ५. | एक किंवा दोन वाक्ये | १ गुण |

■■■